# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईदर, वसई-विरार

पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

**कार्यालयाचा पत्ता-** रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि. ठाणे फोन नंबर ०२२ - २९४५१००१

Email ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट ११/२०२५ दि. ०८/०१/२०२५

**“सुशिक्षित बेरोजगार तरुण - तरुणींना आयकर विभागात वरिष्ठ पदावर नोकरी लावुन देतो अशी बतावणी करुन सुमारे दोन कोटी रुपये पेक्षा जास्त रकमेची फसवणुक करणा-या तोतया आयकर आयुक्ताला अटक करण्यात गुन्हे शाखा कक्ष -३ विरार यांना यश”**

-------ooooo-------

**हकिगत :-** दि.१२/१२/२०२४ रोजी फिर्यादी यांनी पेल्हार पोलीस ठाणे येथे फिर्याद दिली की, सन २०२१ ते आज पावेतो आरोपीत रिंकु शर्मा याने स्वतः आयकर आयुक्त (आय.आर.एस.) अधिकारी असल्याचे भासवुन आयकर विभागाचा लोगो असलेले अंबर दिव्याचे वाहन वापरुन फिर्यादी यांची मुलगी हिस आयकर विभागात आयकर निरीक्षक या पदावर नोकरी लावुन देतो असे सांगुन फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन त्यांचेकडुन वेळोवेळी १५ लाख रुपये घेवुन फिर्यादी यांचे मुलीस आयकर विभागाचे आयकर निरीक्षक बनावट ओळखपत्र व नियुक्ती पत्र देवुन फिर्यादी यांचे मुलीस नोकरी लावुन न देता फसवणुक केली म्हणुन दोन आरोपींविरुध्द पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ९६८/२०२४ बीएनएस कलम ३१८(४), २०४, ३१९ (२), ३३८, ३३६(३), ३४०(२), ३(५) प्रमाणे नोंद आहे.

**गुन्ह्याची उकल :-** सदर घटनेची मा. वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवुन मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे व मा. सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी दिलेल्या सुचना व आदेशान्वये गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखा कक्ष -३ विरार व्दारे सुरु करण्यात आला. तांत्रिक विश्लेषण व गोपणीय बातमीवरुन आरोपीत नामे रिंकु जितु शर्मा वय ३३ वर्षे व्यवसाय- ड्रायव्हर रा. सिध्दीविनायक होम सोसायटी, सर्व्हे नंबर - ३०, तळोजा फेज -२, आर.टी.ओ जवळ, नवी मुंबई, यास दिनांक ०७/०१/२०२४ रोजी ताब्यात घेण्यात आले त्याचे कब्जात एकुण २८ विविध बनावट ओळखपत्रे मिळुन आली. त्यात आयकर विभागाचे सहाय्यक आयुक्त, आयकर निरीक्षक, गृह विभागाचे सहाय्यक आयुक्त व सि.बी.आय. विभागाचे पोलीस आयुक्त या ओळखपत्रांचा सामावेश आहे.

आयकर विभागात सहाय्यक आयुक्त, आयकर निरीक्षक या पदावर नोकरी लावुन देण्याचे आमिष दाखवुन ४० पेक्षा जास्त बेरोजगार तरुण व तरुणी यांची सुमारे २ कोटी पेक्षा जास्त रकमेची फसवणुक आरोपीने केली असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न होत आहे.

उक्त आरोपी यास पुढील कारवाई करीता पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ९६८/२०२४ बी.एन.एस कलम ३१८(४), २०४, ३१९ (२), ३३८, ३३६(३), ३४०(२), ३(५) प्रमाणे या गुन्हयात हजर करण्यात आले आहे.

उपरोक्त कामगिरी श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त सो, श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त सो, श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त सो (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ सहा. पोलीस आयुक्त सो (गुन्हे) मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी पोलीस निरीक्षक/ प्रमोद बडाख, सपोनि/ सोपान पाटील, पोउपनिरी/ उमेश भागवत, सफौ/ अशोक पाटील, पोहवा/मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, सचिन घेरे, सागर बारवकर, अश्विन पाटील, पो.अं./ राकेश पवार, सुमित जाधव, युवराज वाघमोडे, सुनिल पाटील, मनोहर तारडे, तुषार दळवी, अतिष पवार, म.सु.ब/ सागर सोनवणे प्रविण वानखेडे, गणेश यादव, सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष-३ विरार तसेच सफौ/ संतोष चव्हाण, सायबर सेल यांनी पार पाडली आहे.

**-----------00000-------------**